**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय**
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२२२१७
ई.मेल.आय.डी.क्र *dydpune@gmail.com* वेब साईट क्रमांक www.dydepune.com

जा.क्रं.उमाशि-१/पुवि/११वी.प्रवेश/२०१५-१६
दिनांक :- ११/८/२०१५

प्रति,

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये
इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश समाविष्ठ
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका

विषय :- <u>इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१५</u>
सहावी फेरी बाबत...

संदर्भ :- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रं. १२७/२०१४

सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य / मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या एकूण चार प्रवेश फे-या व एक विशेष पाचवी फेरी नुसार सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेले असून सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश त्या त्या कनिष्ठ महाविद्यालयात निश्चित केलेले आहेत.

तथापि अजूनही काही विद्यार्थ्यांना दूरवरचे कनिष्ठ महाविदयालय मिळाले म्हणून तसेच आर्थिक परिस्थिती नसलेले गरिब विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या व अनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळणेबाबत या कार्यालयाकडे मागणी करीत आहेत.

दिनांक ०५ ऑगस्ट रोजी मे. उच्च न्यायालयाने सुनावणी दरम्यान असे निर्देश दिले आहेत की, ६ व्या फेरीमध्ये विविध कारणांनी गैरसोय झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सामावुन घ्यावे आणि शासनाची परवानगी घेऊन सदर फेरीचे आयोजन करावे.

त्यानुसार गैरसोय झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सदर फेरीमध्ये समाविष्ट करुन घेतले जाईल. तसे विद्यार्थ्यांस व पालकांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच मे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एकही प्रवेश ऑफलाईन होणार नाही याची दक्षता आपले स्तरावरुन घेणेत यावी.

ज्या विद्यार्थ्यांची गैरसोय झालेली आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना ६ व्या ऑनलाईन समुपदेशन तक्रार निवारण फेरीमध्ये समाविष्ट होण्याचे आवाहन <u>केंद्रीय प्रवेश समितीमार्फत</u> करण्यात येत आहे.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १

प्रत - माहितीस्तव सविनय सादर

१. मा. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे
२. मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १